(Marathi)

1046
9/91

15.29

22

P.

2071

1529 mar

॥ श्री ॥

# राष्ट्रीय पोवाडा.

डीलाईल रोड ता. कॉं. कमेटीचे सेक्रेटरी वीर तारळकर यांना ४ महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा झाली. या पोवाड्याचें उत्पन्न त्यांचा लहान भाऊ व वृद्ध मातोश्री यांना दिलें जाईल. तरी जनतेनें हस्तें परहस्तें मदत करावी अशी सर्व बांधवांस विनंती आहे.

लेखक व प्रकाशक—
**भिकाजी सखाराम गायकवाड,**
खारावाला बिल्डींग, परेल, लालबाग—मुंबई.

मुद्रकः—
कृष्णाजी नारायण सांपळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, गिरगांव बॅकरोड मुंबई.

1529 mar

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED.
14 JAN. 1931

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1529
Date 17.1.72
GOVT. OF INDIA

# प्रस्तावना.

स्वराज्य—स्वधर्म या करितां ज्यांनीं आपले सर्व आयुष्य खर्च करून स्वताचे प्राणही धोक्यात घातले अशा शूर—वीरांचे गुणवर्णनात्मक व देशाविषयीं स्वाभिमान उत्पन्न करणारी जीं काव्यें, ज्यानां आपण पोवाडे म्हणतों तेंच खरें महाराष्ट्र संगीत. आपण पूर्वी कसे होतो, आज कसे आहोंत याची जाणीव उत्पन्न करून देण्याच्या कामीं हे पोवाडे गावून श्रोत्याची मनें वेधून जागृती उत्पन्न करण्यास या सारखें दुसरें कोणतेच संगीत नाहीं. या पोवाडयाची थोडीशी मांडणी बाळकृष्ण तारळकर यांनीं करून ठेविली होती. त्याप्रमाणें तो पूर्ण करून मी माझ्या स्वताच्य बुद्धीप्रमाणें ही लोकसेवा केली आहे, तरी माझे सर्व बंधु या सेवेचा अनादर न करितां गोड करून घेतील, कारण मी एक साधारण आपला सेवक आहे आणि त्याप्रमाणें सेवा करणें माझा धर्म आहे.

परेल—लालबाग.
ता. १।१०।३१

भिकाजी सखाराम गायकवाड.

# राष्ट्रीय पोवाडा.

## भाग १ ला.

स्वराज्याचा पाया रचण्याला ॥ केले नमन हिंदमातेला ॥
करितो नमन पूज्य देवाला ॥ करीतो नमन महात्माजीला ॥ जी० जी०
आता नमन सर्व जनतेला ॥ लक्ष द्यावे माझ्या पोवाड्याला ॥
एवढी विनंती माझी तुम्हांला ॥ शांत राहूनी ऐकावे कवना ॥ जी० जी०
हिंदुस्थानांत महात्मा जन्मला ॥ जनतेला मार्ग दावीला ॥
जागे केले हिंदुस्थानाला ॥ कशी झोंप आली तुम्हांला ॥ जी० जी०
हिंदुस्थान सर्व बुडाला ॥ परक्यानें हस्तगत केला ॥
लक्ष्मी नेली परदेशाला ॥ देशी धंदा सर्व बुडाला ॥ जी० जी०
दैन्य आले हिंदुस्थानाला ॥ राहिले नाहीं अन्न खायाला ॥
आतां तैयार व्हावें लढण्याला ॥ भारत वर्ष मुक्त करण्याला ॥ जी० जी०
आरोळी झाली सर्व देशाला ॥ सुरु करावें कायदेभंगाला ॥
राग चढला सर्व जातीला ॥ सर्वांनीं विचार हाच केला ॥ जी० जी०
एकोणींसे एकोणत्तिस सालाला ॥ डीसेंबरच्या एकतिस तारखेला ॥
रात्री बाराच्या सुमाराला ॥ स्वातंत्र्याचा ठराव पास केला ॥ जी० जी०
जानेवारी सवीस तारखेला ॥ स्वातंत्र्याचा जाहिरनामा केला ॥
जाहिर केले सर्व देशाला ॥ मानूं नका इंग्रजी कायद्याला ॥ जी० जी०
महात्माजीनें नेम असा केला ॥ घेतले भीष्म प्रतिज्ञेला ॥
पुन्हां नाही येणार आश्रमाला ॥ मिळवीन पूर्ण स्वराज्याला ॥ जी० जी०
आजवरी जुल्म फार केला ॥ आठवावे त्यांच्या जुल्माला ॥
त्यांचा जुल्म सांगतो तुम्हांला ॥ लक्ष द्यावे माझ्या शब्दाला ॥ जी० जी०

चाल बदलून:—

शेतकरी बहुत गांजला ॥ गांजला ॥ शेतसारा डोई जड झाला ॥ जड झाला ॥ नाही राहिले अन्न खायाला ॥ खायाला ॥ वस्त्र मिळेना पोराबाळाला ॥ बाळाला ॥ काय सांगु भाई तुम्हांला ॥ तुम्हांला ॥ जंगलावरती कर बसवीला ॥ गवतावरीही पहारा ठेवीला ॥ ठेवीला ॥ मिळेना गवत गाईबैलाला ॥ बैलाला ॥ जी० जी०

असा जुलूम इंग्रजानें केला ॥ मोठा न्याय सांगती आम्हांला ॥
किती न्याई सरकार म्हणती याला ॥ धि:क्कार अशा सरकाराला ॥ जी० जी०
स्वराज्याचा पाया रचण्याला ॥ केले नमन हिंदमातेला ॥
करीतो नमन पूज्य देवाला ॥ करीतो नमन महात्माजीला ॥ जी० जी०

## भाग २ रा.

मागची आठवण करा या वेळेला ॥ एकोणीसे एकोणीस सालाला ॥
हिंदुस्थानांत बंगाल प्रांताला ॥ रॉलेट कायदा पास केला ॥ जी० जी०
काळा कायदा नांव शोभे त्याला ॥ त्याचा निषेध करण्याला ॥
सभा भरल्या अमृतसराला ॥ जालीयनवाला बागेला ॥ जी० जी०
ताबडतोब त्याच वेळेला ॥ वेढा लष्कराचा हो दीला ॥
हुकूम डॉयूर साहेबाने केला ॥ त्वरीत गोळ्या सोडण्याला ॥ जी० जी०
काय पहाता दादा हुकूमाला ॥ कीती नीच हुकूम त्याने केला ॥
भराभर गोळ्या सोडील्या ॥ धडाधड मुडदे पाडीले ॥ जी० जी०
मांगाने विचार नाहीं केला ॥ कसा काळ विसरला त्याला ॥ अशासाहेबाला जी०
अश्रु आले हिंदमातेला ॥ तिने हांबरडा फोडीला ॥
ऐकू गेला सर्व जगताला ॥ क्रोध चढला सर्व जनतेला ॥ जी० जी०
तसाच जुलूम पंजाबांत केला ॥ पंजाबांत सिंह जन्मला ॥
नांव शोभे लालाजी त्याला ॥ त्यानीं हालविले इंग्रजाला ॥ जी० जी०
सायमनला बहिष्कार केला ॥ लाठीने मारीले त्याला ॥
धडधडीत खून असा केला ॥ असे सरकार पाहिजे कोणाला ॥ जी जी०

चाल बदलून:—

असे जुल्लम केले अनिवार ॥ केले अनिवार ॥ जनतेला छळीले फार ॥ छळीले फार ॥ लढण्याचा केला निर्धार ॥ केला निर्धार ॥ घेणार नाही माघार ॥ नाही माघार ॥ प्रतिज्ञाच पूरी करणार ॥ पूरी करणार ॥ गुलामीत नाही राहाणार ॥ नाही राहाणार ॥ शेवटच्या लढा लढणार ॥ लढा लढणार ॥ विजई होणार कींवा मरणार ॥ जी० जी०
स्वराज्याचा पाया रचण्याला ॥ केले नमन हिंदमातेला ॥
करितो नमन पूज्य देवाला ॥ करीतो नमन महात्माजीला ॥ जी० जी०

## भाग ३ रा.

चालु जुल्लम सांगतो तुम्हांला ॥ चित्त द्यावे माझ्या पवाड्याला ॥
जुल्लम पेशावरामधें केला ॥ तेथे असंख्य बळी घेतला ॥ जी० जी०
रक्ताचा पूर वाहिला ॥ मुळी भ्याले नाही देवाला ॥
पाहिले नाही मुलाबाळाला ॥ धडाधड गोळ्या सोडील्या ॥ जी० जी०
माणसावरुनी गाडया चालविल्या ॥ छातीवरति गोळ्या घातल्या ॥
कसा मृत्यु वीसरला यांना ॥ अशा साहेबानां ॥ अशा नीच्याना ॥ जी० जी०
तसेच केले सोलापुराला ॥ तेथे मार्शलॉ पुकारीला ॥
घरामध्यें गोळ्या सोडील्या ॥ निरपराधी मारले जनतेला ॥ जी० जी०
सुळावरी दीले चौघाला ॥ मुळी न्यायच नाहीं केला ॥
कित्येकांना सजा ठोकील्या ॥ पंधरा वर्षे काळ्या पाण्याला ॥ जी० जी०

चाल बदलून:—

किती जुल्लमी हे सरकार ॥ सरकार ॥ प्रजेवरीं जुल्लम केला फार ॥ केला फार ॥ त्याचा करण्याला प्रतिकार ॥ प्रतिकार ॥ हिंदुस्थान झाले तैयार ॥ तैयार ॥ जी ॥ लढण्याचा केला निर्धार ॥ निर्धार ॥

शांतीचें शस्त्र अनीवार ॥ अनीवार ॥ बहिष्कार तोफ मोठी फार ॥
मोठी फार ॥ गोळा भरुनी केली तैयार ॥ केली तैयार ॥ जी ॥
सात हजार मैल पल्ल्याला ॥ गोळा जावून लागला शत्रुला ॥
वैऱ्याचा धुवा उडाला ॥ चारी बाजूने मारा केला॥ मार्ग नाहीं त्याला ॥ जी ॥
विश्वास पूरा ठेवून ॥ श्रीहरीचे नांव घेवूनी ॥
संग्राम करा दारुण ॥ हिंदमातेचे फेडावे ऋण ॥ जी० जी० ॥
स्वराज्यांच्या पाया रचण्याला ॥ केले नमन हिंदमातेला ॥
करीतो नमन पूज्य देवाला ॥ करीतो नमन महात्माजीला ॥ जी० जी०

## भाग ४ था.

जुल्म केला मुंबई शहराला ॥ बोरीबंदर अझ्याद मैदानाला ॥
एकोणीसे तीस सालाला ॥ जून महिना एकविस तारखेला ॥ जी० जी०
हुकूम कॉंग्रेस कमीटीनें केला ॥ सत्याग्रहि परेड करण्याला ॥
कीति दस्तुर साहेब हो भला ॥ त्यानी मनाई हुकूम काढीला ॥ जी०
सुरु केली परेड करण्याला ॥ तोडले दस्तुरच्या हुकूमाला ॥
राग चढला हेली साहेबाला ॥ ताबडतोब हुकूम त्याने केला ॥ जी० जी०
झोडपुनी काढा सर्वाला ॥ काय पहाता पीवळ्या पागडीला ॥
धडाधड मारले लोकाला ॥ जशी कणसे झोडती मळणीला ॥ जी०
पाहिले नाही आई बहिणीला ॥ केस धरुनी लोळवीले त्यांना ॥
घोडेस्वार आमुचे भाई ॥ घोडया एवढीहि अक्कल नाहीं ॥ जी० जी० ॥
घोडे च्यार पाय उडवीले ॥ बायका पुरुषांना तुडविले ॥
कसे डोळे तुम्हीं झाकले ॥ असे निच प्रकार पाहिले ॥ जी० जी० ॥
दुसऱ्या लाठीची देतो आठवण ॥ अझुन नसेल विसरला जाण ॥
तारीख अकरा जुलई महिन्याला ॥ लाठी चालली गढवाली दीना ॥ जी०

चाल बदलून:—

धन्य धन्य गढवाली जन ।। गडवाली जन ।। धर्माचे केले रक्षण ।। केले रक्षण ।। निशस्त्र प्रजा पाहून ।। प्रजा पाहून ।। शस्त्र नाही चालविले त्यानी ।। चालविले त्यानी ।। सरकारी हुकुम मोडून ।। हुकूम मोडून ।। सजा भोगिल्या दारुण ।। कीती दारुण ।। खरे मर्द हेची हो जाणा ।। हेची हो जाणा । ठेवला धर्माचा अभिमान ।। शिक्षा भोगून ।। जी० ।।

## भाग ५ वा.

माहिना आगस्ट तारीख दोन ।। तिसऱ्या लाठीची करा आठवण ।।
होता टिळक स्मृति दीन ।। त्याच दिवशी केला अपमान ।। जी० जी०
टिळकांचे पुण्य स्मरण ।। सर्व जनता चालली जमुन ।।
आडविले सर्व जनतेला ।। जनतेने सत्याग्रह केला ।। जी० ।।
चोवीस तास बसून राहिले ।। मुळी अन्न नाही घेतले ।।
विचार हेली साहेबाने केला ।। हॉटसन साहेबाला बोलविला ।। जी०
दोघानी विचार पुरा केला ।। झोडपूनी काढा सर्वाला ।।
काय पहाता पोलीस भाईला ।। आठसे लोक जखमी त्यानी केला ।। जी०
एक तेव्हांच बळी घेतला ।। वीर हर गोविंद नाम त्याला ।।
त्याचा आत्मा स्वर्गासी गेला ।। त्रैलोक विजई झाला ।। जी० जी०
नष्ट आमचे पोलीस भाई ।। मातृभूमिचा अभिमान नाहीं ।।
ज्या भूमिचे सदा खाती अन्न ।। तिला कसे झाले बैमान ।। जी० जी०
जीचे पोटी जन्मले जाण ।। तीचा ठेवला नाहीं अभिमान ।।
किती करिती गनिमी कावा ।। तुरुंगी घालती देशबांधवा ।। जी० जी०
शाहिर सदा विनवी तुम्हांला ।। सोडा हो कसाई धंद्याला ।।
सदा स्मरा जन्मदात्याला ।। जाब द्यावा लागेल तुम्हांला ।। जी०
गायकवाड शाहिर गातो कवनाला ।। तारळकर होते मदतीला ।।
दोघानीं पवाडा बसवीला ।। सादर केला राष्ट्रसेवेला ।। जी० जी०

स्वराज्याच्या पाया रचण्याला ।। केले नमन हिंदमातेला ।।
करितो नमन पूज्य देवाला ।। करीतो नमन महात्माजिला ।। जी०जी०

---

# दारुचा पोवाडा.

देशाला मुक्त करण्याला । स्वराज्याला लायक होण्याला ॥
महात्माजींची विनंती तुम्हांला । सोडावे सर्व व्यसनांला ॥ जी० जी०

घातकी दारुचा प्याला । शिवू नका तुम्हीं ताडीला ॥
परक्यांचा डाव साधला । दैन्य आले सर्व देशाला ॥ जी० जी०

दारुच्या आंगचे दुर्गुण । तुम्हांला देतो सांगुन ॥
भल्याची अब्रू करी हरण । वाईट येतां परीणाम ॥ जी० जी०

बंधुनो दारु तुम्हीं पिता । निषेमधें घराकडे जाता ॥
बायको पोरानां बडवीता । शेजाऱ्याना शिव्या तुम्हीं देता ॥ जी० जी०

मराठ्याचे शूर मर्दांचे । म्हणविता वंश तुम्हीं त्यांचे ॥
सदा दारुमध्यें तुम्हीं धुंद । कशी अक्कल झाली तुमची मंद ॥जी०जी०

भाईनो दारुचा प्याला । कीती वीषानीच हा भरला ॥
कसें भुलुन राहिले त्याला । मुळी शरम नाहीं तुम्हांला ॥ जी० जी०

थु: त्यांच्या जिनगानीवरति । सदा ज्यांची दारुवरी प्रिती ॥
सर्वदा धुंद रहाती । आपुला नाश करीती ॥ जी० जी०

गायकवाड शाहिर विनवीतो । तुमचेच हित सांगतो ॥
त्वरीत जागे तुम्हीं व्हा ना । डोळे उघडा ना ॥ जी० जी०

---